# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)

**Yashwantrao Chavan Academy of Development Administration**
(A Government of Maharashtra Organisation)

सत्यमेव जयते

यशदा®
ISO 9001 : 2008


एम.डी.सी-II/2016-17/Pur. Kit. Items
दि.21/03/2017.

प्रति,
**देवी एन्टरप्रायजेस**
चंद्रशेखर चौक, संगमनेर,
अहमदनगर- 422605.

**विषय:- किचन आयटम खरेदी करण्याबाबत...**
संदर्भ 1:- आमचे पत्र क्र. MDC-II/2016/Pur. of Kitchen Items; दि.18/01/2017.
संदर्भ 2:- आपले दरपत्रक दि.25/01/2017.
संदर्भ 3:- आमचे खरेदी आदेश क्र.MDC-II/2016-17/Pur. of Kitchen Items; Dt.14/02/2017.
संदर्भ 4:- आपले ई-मेल दि.15/02/2017.
संदर्भ 5:- आमचे पत्र क्र.MDC-II/2016-17/Pur. of Kitchen Items; Dt.07/03/2017.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.1 नुसार यशदा, एम.डी.सी. साठी Kitchen Items ची खरेदी करण्यासाठी दि.18/01/2017 ते दि.27/01/2017 या कालावधी मध्ये दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर प्रक्रियेमध्ये आपण देखील सहभाग घेतला होता व दर सादर केले होते (संदर्भ क्र.2).

दरमागणी पत्रकातील एकूण 07 वस्तूंपैकी फक्त 02 वस्तूंकरिता आपला दर न्यूनतम असल्याचे दिसुन आले व त्यानुसार आपणास खरेदी आदेश देण्यात आले होते (संदर्भ क्र.3), परंतु सादर केलेल्या दरामध्ये फक्त दोन वस्तूंचा पुरवठा करण्यास आपण असमर्थ असल्याचे आपण ईमेलद्वारे कळविले आहे (संदर्भ क्र.4).

उपरोक्त कारणामुळे यशदातील काळ्या यादीमध्ये आपल्या नावाचा समावेश करण्याकरण्याबाबत यशदाकडून गांभिर्यपुर्वक विचार करण्यात येत असून आपणाकडुन सदर प्रकाराबाबत दि.15/03/2017 रोजी पर्यंत लेखी खुलासा मागविण्यात आला होता व लेखी खुलासा सादर न केल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आपणास कळविण्यात आले होते (संदर्भ क्र.5). सदर मुदतीमध्ये आपणाकडुन खुलासा प्राप्त झालेला नाही.



राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे ४११ ००७. भारत (इपीएबीएक्स) : (०२०) २५६०८००० कार्यालयीन वेळेनंतर : २५६०८२७१, फॅक्स : २५६०८१००
Raj Bhavan Complex, Baner Road, Pune 411 007. India (EPABX) : (020) 25608000 After Office Hrs. : 25608271, Fax : 25608100
Email : yashada@vsnl.com contact@yashada.org | Website : www.yashada.org

सदर कारणामुळे आपला समावेश यशदाच्या काळ्या यादीत करण्यात येऊन भविष्यात आपणास यशदाच्या कोणत्याही प्रकारच्या दरपत्रक/निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे.

(निबंधक)
यशदा, पुणे

प्रत - **मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान केंद्र**
यांनी यशदाच्या वेबसाईटवर यशदातील ठेकेदाराची ब्लॅक लिस्टचे फोल्डर तयार करुन त्यामध्ये सदर ठेकेदाराचा काळ्या यादीमध्ये समावेश केल्याबाबतचे तपशीलाचा समावेश करावा.